**PRESS NOTE**

THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.


प्रति,
संपादक / वृत्तसंपादक
कृपया प्रसिद्धीकरिता सादर

(बाळासाहेब झोडगे)
हं . जनता संपर्क अधिकारी
बेस्ट उपक्रम
दूरध्वनी क्र.२२७९९३९६

---

प्रसिध्दी पत्रक क्र.२७

दिनांक : ०१.०३.२०१९

## 'महाशिवरात्री' सणा निमित्त बेस्टच्या जादा बसगाडया

मुंबई, ०१ - सोमवार, दिनांक ०४.०३.२०१९ रोजी 'महाशिवरात्री सण' साजरा होत असून या सणानिमित्त कान्हेरी गुंफा येथील शिवमंदिरास भेट देणा-या भाविकांच्या सोयीसाठी बेस्ट उपक्रमातर्फे बसमार्ग क्र.१८८ मर्या. वर बोरीवली रेल्वे स्थानक (पूर्व) ते कान्हेरी गुंफा दरम्यान नियमित बससेवा तसेच संजय गांधी राष्ट्रीय उद्यान ते कान्हेरी गुंफा दरम्यान सकाळी ११.०० वा. पासून संध्याकाळी १९.०० वा. पर्यंत एकूण ५ जादा बसगाडया प्रवर्तित करण्यात येणार आहेत. भाविकांना मार्गदर्शन करण्यासाठी गर्दीच्या ठिकाणी विशेषतः संजय गांधी राष्ट्रीय उद्यान प्रवेशद्वार, एलोरा चौकी (बोरीवली स्थानक-पूर्व) तसेच कान्हेरी गुंफा येथे बसनिरीक्षक आणि वाहतूक अधिका-यांची नियुक्ती करण्यात येणार आहे.

या व्यतिरिक्त बाबुलनाथ येथील शिवमंदिरास भेट देणा-या भाविकांच्या सोयीसाठी सकाळी ०७.०० ते संध्याकाळी १९.०० यावेळे दरम्यान बसमार्ग क्र.५७, ६७ आणि १०३ या बसमार्गांवर एकूण ६ जादा बसगाडया सोडण्यात येणार आहेत. बाबुलनाथ मंदिर येथे भाविकांना मार्गदर्शन करण्यासाठी वाहतूक अधिकारी व बसनिरीक्षकांची नियुक्ती करण्यात येणार आहे.

सर्व प्रवाशांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी या जादा बसगाडयांचा लाभ घ्यावा.

=======